
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - III January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठा समाज : एक अभ्यास<br>**कवडे योगेश बाबासाहेब** | १-४ |
| २ | उस्मानाबाद जिल्ह्यातील मध्ययुगीन जलव्यवस्थापन : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**भाऊसाहेब हौसेराव हुंबे**<br>**डॉ. प्रशांत अर्जुनराव साबळे** | ५-७ |
| ३ | मराठा साम्राज्यातील व्यापार, वाणिज्य, शासन, प्रशासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध<br>**प्रा. सलामपुरे फुलचंद**<br>**प्रा. बाटोरे सुनिता** | ८-१० |
| ४ | शिवकालीन न्यायव्यवस्था (इ. स. १६३०ते १६८०)<br>**प्रा. बच्छाव अर्चना वालचंद** | ११-१४ |
| ५ | मराठेशाहीतील प्रशासन व्यवस्था<br>**प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत** | १५-१८ |
| ६ | मराठा आरक्षण : प्रश्न भूकेचा आहे हो..!<br>**डॉ. गणेश मोहिते** | १९-२२ |
| ७ | मराठा साम्राज्य : जाती व्यवस्था आणि बलुतेदारी पध्दत<br>**किशोर भीमराव भद्रे** | २३-२५ |
| ८ | छ. शिवरायांचा राज्य व शासनप्रती दृष्टिकोन<br>**प्रा. डॉ. दत्ता मा. कुंचेलवाड** | २६-३२ |
| ९ | पालि साहित्य व संस्कृती परस्पर संबंध<br>**डॉ. संदीप अर्जुनराव बनसोडे**<br>**शीला विठ्ठलराव डोंगरे** | ३३-३६ |
| १० | मराठा साम्राज्य व लोकसाहित्य<br>**डॉ. सविता खोकले** | ३७-३९ |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराज आणि मुस्लिम वंश : सलोख्याचे संबंध<br>**घाटगे गौतम व्यंकटी** | ४०-४४ |
| १२ | मराठा साम्राज्य : होळकर घराण्यातील कर्तबगार स्त्रियांचे योगदान<br>**मदन मानसिंग चव्हाण** | ४५-४९ |




Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ५. मराठेशाहीतील प्रशासन व्यवस्था

प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत
इतिहास विभाग प्रमुख, आर. बी. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.

**प्रस्तावना**

जगाच्या इतिहासात शिवाजी महाराजांन सारखे महान संघटनाकार, प्रजाहितदर्श, प्रजाहितदक्ष, विजयीयोद्धा इ. गुणांनी संपन्न असणारा राजा म्हणजे छत्रपती शिवराय. शिवरायांच्या कारभाराची पद्धत ही पुर्वीच्या मुसलमान किंवा हिंदु राज्य पद्धतीचा नक्कल नव्हती. आपल्या जनतेला स्वतंत्र मिळावे, एक राष्ट्र या नात्याने जनता एक जुटीने नांदावी, या एक जुटीत स्वरक्षणाची आणि आपले हक्क दुसऱ्यांना पाळायला लावायची सक्ती असावी अशा प्रकारे शिवरायांची आकांक्षा होती. यासाठी महाराजांनी आपल्या प्रशासनात काटेकोरपणा, विश्वास आणि त्याग इ. गोष्टी निर्माण केल्या. महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे कार्य केवळ एकनिष्ठ व स्वामीभक्त सेनेच्या भरवशावर केले. नेपोलियन प्रमाणेच शिवाजी महाराज राज्यकर्ता या नात्याने योग्यता अतिशय थोर होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे संपुर्ण जीवन एक संघर्ष यात्राच होती असे म्हणावे लागेल. शिवाजी महाराजांचे संपुर्ण जीवनच मैदानी लढयापुरतेच मर्यादित नव्हते. महाराजांनी आपल्या आयुष्यात अनेक धाडसी विचार मांडले आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी स्वत: पासुनच केली. शुन्यातुन स्वराज्य निर्माण करण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले. स्वराज्यातील सामान्य जनतासुखी, समधानी व आनंदी असली पाहिजे. जनतेला स्वराज्य हे सुराज्य आपणास हवे आणि स्वराज्यातील जनकल्याणकारी प्रशासन व्यवस्थेमुळे रयतेला आपले वाटले पाहिजे अशी प्रजाहितदक्ष शिवाजी महाराजांची रास्त भुमिका होती. शिवाजी महाराजांचे चारित्र्य घडविण्याचे महत्त्वाचे काम आई जिजाबाई आणि गुरु दादोजी कोंडदेव यांचा मोठा सिंहाचा वाटा आहे असे म्हणावे लागेल. डॉ बालकृष्ण लिहितात जिजाईचे शरीर स्त्रीचे पण बुद्धी पुरूषाची होती. संपूर्ण आयुष्यभर ही मात्र शिवछत्रपतींची मार्गदर्शक त्यांच्या तात्विक दृष्टीकोनाची गंगोत्री व त्यांच्या प्रेमाचे सर्वात मोठे अधिष्ठान होती. त्याच्याकडुनच मराठ्यांचा स्वयं, महाप्रणाली, कर्तबगार छत्रपती घडविला. शिवाजी महाराज म्हणतात हे राज्य व्हावे ही श्रींच्या मनात फार आहे. प्रजेचे सुख तेच राजाचे सुख, प्रजेचे हित तेच राजाचे हित, प्रजा सुखी तर राजा सुखी ही शिवाजी महाराजांची मनोधारणा होती आणि त्यानुसार लोककल्याणकारी प्रशासन व्यवस्था निर्माण केली. राज्य मिळविणे जेवढे अवघड असले तेवढेच ते टिकविणे कठिण असते. मिळालेले राज्य टिकवणे व ते उत्तमपणे चालवणे यासाठी उत्तम प्रशासनाची आवश्यकता असते. राज्य सुरळीत चालवण्यासाठी योग्य प्रशासनाची गरज असते. त्या दृष्टीने शिवाजी महाराजांनी शासनयंत्रणा उभी केली. मराठे कालीन प्रशासनात छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व शासन व्यवस्थेचे प्रमुख होते. शिवाजी महाराजांनी राज्यविस्तारा बरोबरच राज्याच्या योगय प्रशासनासाठी काही पदांची निर्मिती करण्यात आली. त्यावर सुयोग्य अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. राज्याभिषेकाचे वेळी शिवाजी महाराजांनी अष्ट प्रधानांची नियुक्ती केली. शिवाजी महाराजांच्या अस्टप्रधान मंडळाची निर्मिती इ.स. 1674 मध्ये झाली



Scanned with CamScanner

असली तरी या मंडळाची सुरूवात 1642 पासुन झालेली दिसुन येते. छत्रपती शिवाजी महाराजांना प्रशासनात मदत करणाऱ्या अष्टप्रधानांची नावे पुढील प्रमाणे, इ.स. 1713 मध्ये शाहु महाराजांनी बाळाजी विश्वनाथाला पेशवेपदाची वस्त्रे दिली. बाळाजी विश्वनाथांनी 1719 मध्ये दिल्लीच्या बादशाहकडुन चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. दहा हजाराची मनसब स्वीकारली. शिवाजी महाराजांनी स्वत: मिळविलेले स्थान दुय्यम झाल्याचे दिसुन येते. छत्रपती पद संपुष्टात आले आणि पेशवे हे सत्तेचे केंद्र बनले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जी राज्य व्यवस्था निर्माण केली. त्यामध्ये अनेक बदल पेशव्यांना करावे लागले. शिवाजी महाराजांनी जी प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्याचा पुर्ण त्याग पेशव्यांनी केला असे नव्हे. विविध धर्मग्रंथांनी कालानुरूप प्रचलित केलेल्या संहिता यावर पेशव्यांची राज्यव्यवस्था आधारित होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात निर्माण केलेले पदे हे वंशपरंपरागत नव्हती. परंतु पुढे शाहुच्या काळात पेशवा, प्रतिनिधी, सेनापती, सचिव, सामंत, सेनारक्षा इ. सर्व पदे वंशपरंपरागत ठेवली. पेशवे कालीन प्रशासन व्यवस्थेमध्ये फारसा फरक केल्याचे दिसत नाही. परंतु प्रशासन व्यवस्थेतील (केंद्रीय, प्रांतिक, खेडे) प्रशासनांच्या अधिकाऱ्याला पुर्णतहा स्वायत्ता देण्यात आली आहे. पेशवे हे अधिकाऱ्यावर अधिकार गाजवत नसत. छत्रपती शिवाजी, संभाजी महाराजांच्या काळात केंद्रीय सत्ता प्रबळ होती. छत्रपती कर्तबगार व प्रभावशाली असल्यामुळे मंत्र्यांना काबुत ठेवत असत.

**किल्याचे महत्त्व**

छत्रपती शिवरायांविषयी संपुर्ण जगात आदराची भावना आहे. स्वराज्यकार्याच्या प्रारंभी तोरणा, पुरंदर, सिंहगड, राजगड हे चार किल्ले मावळ प्रांताचे जणू रखवालदारच असल्याने शिवाजींनी ते प्रथम आपल्या ताब्यात आणले.

गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे राजलक्ष्मी, गडकोट म्हणजे राज्याचे प्राणरक्षक असे वर्णन आज्ञापत्र या ग्रंथात आलेले आहे. यावरून किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात येते. सर्वसामान्यपणे शत्रूच्या हल्ल्यापासून बचाव / संरक्षण करण्यास सूलभ जावे आणि आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून बांधलेल्या वास्तूचा उल्लेख इंग्रजीत For संस्कृतमध्ये दुर्ग आणि मराठीत किल्ला असा उल्लेख केला जातो. अशा गडकोटांचे वेगवेगळे प्रकार असून अर्थशास्त्र या प्राचीन ग्रंथात कौटिल्याने किल्ल्यांचे चार प्रकार सांगितले आहेत. जलदुर्ग, डोंगरी किल्ले, भुईकोट, वनदुर्ग

महाराष्ट्रातील अनेक प्रकारचे किल्ले अस्तित्वात आहेत. स्वराज्य निर्माण करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक किल्ल्यांची निर्मिती केली त्यातील सिंधुदुर्ग हा मराठी आरमाराच्या शौर्याचे प्रतिक आणि मराठी मनाचा मानबिंदू म्हणून ऐतिहासिक किल्ला ठरतो. सर्व किल्ले हे स्वराज्यांची वैभवशाली इतिहासाची साक्ष देतात. म्हणूच छत्रपती शिवाजी महाराजांचे या किल्ल्यांकडे विशेष लक्ष होते.



Scanned with CamScanner

**पायदळ :** पायदळात शेतकरी व मावळे यांचा समावेश असे. शेतकरी अचूक नेम धरण्यात पटाईत तर मावळे तलवार फिरविण्यात तरबेज असत. प्रत्येकाकडे ढाल, तलवार इ. शस्त्रे असत. पायदळातील सैन्य डोंगर कडेकपारी लढण्यात दऱ्याखोऱ्यात चपळ हालचाली करण्यास तरबेज होते.

**घोडदळ :** घोडदळात बारगीर व शिलेदार असे दोन प्रकार असत. बारगीर म्हणजे सरकारी घोडेस्वार. बारगीरांच्या घोडदळास पागा म्हणत. पागेतील घोडी सरकारी असत. त्यांचा चारा - वैरण, खरारा इ. सर्व सरकारातून होत असे. शिलेदार म्हणजे स्वत:चा घोडा घेऊन सरकारी चाकरी करणारा. घोड्याची निगा त्याला स्वत: करावी लागे. याकरता सरकारातून त्याला जास्तीचा तनखा मिळेल. सरकारी घोड्यांची ओळख व मोजदात करने सोपे व्हावे म्हणून घोड्यांच्या मागील चमड्यावर शिक्के मारीत असत. पंचवीस घोड्यामागे एक पखाली व नालबंद असे.

घोडदळाची रचना खालील प्रमाणे होती

बारगीर किंवा शिलेदारावर-हवालदार, हवालदारावर-जुमलेदार, जुमलेदारवर-सुभेदार, सुभेदारवर-पंचहजारी सर्व सुभेदार व पंचहजारी वर सेनापती असे.

**उंटदळ व हत्तीदळ:** महाराजांच्या सैन्यात उंट व हत्ती यांची संख्या मर्यादित होती. उंटांचा उपयोग सामानसुमान व लहान तोफा वाहून नेण्यासाठी केला जाई. हत्ती वैभवाचे लक्षण होते त्यांचा उपयोग अंबारी, युद्धाचे निशाण वाहून नेणे, शत्रूपक्षाचे किल्ल्याचे दरवाजे तोडणे इ.साठी केला जात असे.

**युद्ध पद्धती :** महाराष्ट्राचा प्रदेश डोंगर, दऱ्या खोऱ्यांचा व घनदाट जंगलाचा असल्याने सैन्याच्या हालचाली गतिमान होण्यासाठी घोडदळ व पायदळ हेच फार महत्वाचे भूमिका पार पाडीत असत. बैल व बैलगाडीचा तसेच इतर साधनांचा देखील वापर केला जाई. सैन्य उभारणी, शस्त्रास्त्र निर्मिती, नव्या गडकोटांची उभारणी व जुन्यांची डागडुजी इ. साठी शत्रू प्रदेशातून लुट करावी लागे अर्थात ही लुट करताना रयतेला त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली जाई. शिवरायांकडे पैसा, सैन्य, हत्यारे दारूगोळा इ. कमी असल्याने तसेच महाराष्ट्राची भूमी डोंगर, दऱ्या खोऱ्यांची व घनदाट जंगलाची असल्याने गनिमी कावा हा युद्ध प्रकार महाराजांनी विकसित केला. याशिवाय प्रसंगानुरूप युद्ध लढले जाई. मान्याच्या बळकट जागा धरून, घोड्यांची, डोंगरी व पहाडी, जंगली, झाडाझुडपातील इ. युद्ध पद्धतीचा महाराजांनी उत्कृष्टपणे वापर केला. युद्ध मोहिताम स्त्रिया बरोबर नेण्यास कडक निर्बंध होते. पावसाळ्यात दसऱ्यानंतर लष्करी मोहिमा सुरू होत.

**सैन्याचे नियम :** शिवरायांनी आपल्या सैन्यास कडक नियम बनविले होते. त्यांच्या गरजा अत्यंत मर्यादित असत. अत्यंत साधी रहानी, सैन्याबरोबर अवजड सामान नसे. आवश्यक गरजेच्या वस्तु, तलवार, भाला, बरची, थोडीशी भाकरी, घोड्यासाठी हरबरे, एखडे घोंगडे एवढेच बरोबर ठेवतायेई. मोहिमेत सर्व धार्मिय धार्मिक स्थळे, स्त्रिया, लहानमुले, रुद्ध, सामान्य रयत, इ. ना त्रास होणार नाहीयाची खबरदारी सैन्याला घ्यावी लागे. मिळविलेल्या लुटीचा सर्व हिशोब संबंधिताकडे द्यावा लागे. या सर्व नियमांचे उलंघन केल्यास कडक शासन केले जाई.



Scanned with CamScanner

**सारांश**

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. ते [illegible] टिकवण्यासाठी राजकारण व युद्धनिती या दोन्हीचा उपयोग करून टिकविण्याचे काम केले. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद या चार सूत्रांचा वापर करावा लागला. पुढे पेशवाईमध्ये याउलट चित्र पहाण्यास मिळाले. कर्तबगार नेता नसेल तर योजकस्तत्र दुर्लभ असे म्हणतात. तलवारीच्या जोरावर मिळविलेले स्वराज्य घोडदौडीने विस्तार पावलेले साम्राज्य अखेर लयास गेले. मराठा कालखंडातील शिवाजी महाराज कालीन प्रशासन व पेशवेकालीन प्रशासनाच्या पुर्न लेखन होणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

1) मराठ्यांचा इतिहास - प्रा. अरुणा मोरे, डॉ. भारती नययर, डॉ. स्वाती काळभोर
2) छत्रपती शिवाजी महाराज - प्र.न. देशपांडे
3) मराठ्यांचा इतिहास - अ.रा. कुलकर्णी ग.ह. खरे (भाग 1,2,3)
4) मराठ्यांचा इतिहास - डॉ. श.गो. कोलारकर (इ.स. 1600-1818)
5) पेशवे कालीन महाराष्ट्र - डॉ.पी.ए. गवळी



Scanned with CamScanner